Prabhu Shri Ramchnadra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affileted with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# Maotoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

(NAAC Accredited With 'B' Grade)

# GEOGRAPHY DEPARTMENT

।। आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत: ।।


# Departmental Activities

## Session :- 2022-23

# जागतिक ओझोन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचा अहवाल

दि. १६.०९.२०२२


मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय वाशिम तथा भूगोल विभागात द्वारा महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना ओझोन दिनानिमित्त ची माहिती व्हावी या उद्देशाने भूगोल विभागाने दिनांक 16 सप्टेंबर 2022 रोजी ओझोन दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी. आर. तनपुरे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. व्हि.बी. खराते यांची उपस्थिती लाभली. तसेच ना. ना. मुंदडा महाविद्यालय मालेगाव येथील प्रा.किशोर बयस हे सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. डी. एन. लांजेवार यांनी प्रास्ताविकेत 16 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन थर संरक्षण दिवस साजरा केला जातो. याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख  मार्गदर्शक डॉ. व्हि. बी. खराते यांनी ओझोन थर हा  पृथ्वीला सूर्याच्या अतिनील किरणाच्या हानिकारक प्रभावापासून मानवाचे संरक्षण कसे करतो तसेच ओझोन थराची निर्मिती ची प्रक्रिया आणि ओझोन थराचा होणाऱ्या ऱ्हासाला कमी करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करता येऊ शकतात. याविषयी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. आर. तनपुरे यांनी दरवर्षी 16 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन थर संरक्षण दिवस साजरा केला जातो या दिवशी सर्व देशांना आपला ओझोन थर जतन करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाकडे लक्ष देण्यास प्रोत्साहित केल्या जाते तसेच ओझोन हा पृथ्वी ग्रहांसाठी एक प्रकारचे ढाल म्हणून कार्य करते आणि हे पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. असे आपले मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पंचशीला भिसे हिने तर आभार कु. आंचल तिवारी हिने व्यक्त केले.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. व्हि.बी. खराते




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. डी. एन. लांजेवार


Ishwari Colony Rd, Washim, Maharashtra 444505, India
Washim
Maharashtra
India
2022-09-16(Fri) 01:05(PM)
28°C
82°F
Washim Bus Stand
Washim
वाशीम
Google

# गोटे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वाशिमच्या ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळांना भेट

दि. ११ डिसे. २०२२

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या इतिहास व भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी दि ११ डिसे. २०२२ रोजी वाशिम येथील ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देवून या स्थळांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांना वाशिम शहरातील ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळांचा इतिहास माहिती व्हावा, पर्यटन स्थळांची माहिती व्हावी, परिसराची भौगोलिक माहिती मिळावी या अनुषंगाने या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.डॉ. बी.आर.तनपुरे आणि प्रा.डॉ. डी .एन. लांजेवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी चिंतामणी मंदीर, काजळेश्वर मंदीर, चर्च, जैन मंदीर, मध्यमेश्वर मंदीर, राजे वाकाटक वाचनलाय,बालाजी मंदीर,देव तलाव, पद्मतिर्थ, चांमुडा देवी मंदीर, पाळेश्वर मंदीर इत्यादी स्थळांना भेट दिली. याप्रसंगी प्रा.डॉ. बी.आर.तनपुरे आणि प्रा.डॉ. डी.एन.लांजेवार यांनी या स्थळांचा इतिहास व भौगोलिक वैशिष्ट्य याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. या सहलीमध्ये शेख फैजान, आदित्य गायकवाड, गजानन पडघान, गौरव कांबळे, वैभव गायकवाड, स्वाती बदर, गायत्री कांबळे, वैष्णवी ठाकरे, कोमल राजे, अंजली वानखेडे, विजया खंदारे, प्रियंशू लोढे, जगदिश शिंदे, सचिन लोखंडे, विश्वनाथ काळेराव, ज्ञानेश्वर जाधव, नेहा केशवे, हर्षा पट्टेबहादूर, रानी रणबावळे, मुस्कान भवानीवाले, हर्षना अयाल आदी विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

वाशिम शहरातील धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी दरम्यान सहभागी विद्यार्थी व

प्रा. डॉ. डी. एन. लांजेवार







GEOGRAPHY DEPARTMENT



महासागर गुरूवार, दि.१५ डिसेंबर २०२२
वाशिम

# गोटे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वाशिमच्या ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट



**वाशिम/प्रतिनिधी**

स्थानिक, मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या इतिहास व भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी दि ११ डिसें. २०२२ रोजी वाशिम येथील ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देवून या स्थळांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांना स्थानिक स्थळांचा इतिहास माहित व्हावा, पर्यटन स्थळांची माहिती व्हावी, परिसराची भौगोलिक माहिती मिळावी या अनुषंगाने या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.डॉ. बी.आर.तनपुरे आणि प्रा.डॉ. डी .एन. लांजेवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी चितांमणी मंदीर, काजळेश्वर मंदीर, चर्च, जैन मंदीर, मध्यमेश्वर मंदीर, राजे वाकाटक वाचनलाय,बालाजी मंदीर,देव तलाव, पद्मतिर्थ, चामुंडा देवी मंदीर, पाळेश्वर मंदीर इत्यादी स्थळांना भेट दिली. याप्रसंगी प्रा.डॉ. बी.आर.तनपुरे आणि प्रा.डॉ. डी.एन.लांजेवार यांनी या स्थळांचा इतिहास व भौगोलिक वैशिष्ट्य याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. या सहलीमध्ये शेख फैजान, आदित्य गायकवाड, गजानन पडघान, गौरव कांबळे, वैभव गायकवाड, स्वाती मदने, गायत्री कांबळे, वैष्णवी ठाकरे, कोमल राजे, अंजली वानखेडे, विजय खंदारे, प्रियंशू लोढे, जगदिश शिंदे, सचिन लोखंडे, विश्वनाथ भालेराव, ज्ञानेश्वर जाधव, नेहा केशवे, हर्षा पट्टेबहादूर, रवि रणबावळे, मुस्कान भवानीवाले, हर्षाली भागत आदी विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

# गोटे महाविद्यालयात भुगोल अभ्यासमंडळांची स्थापना

दि. 06 डिसे. २०२२

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे विविध विषयांच्या अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र , इतिहास, भूगोल व मानसशास्त्र या विषयाची अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. सदर कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय गोटे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.व्ही.ई.डोणगावकर व डॉ. व्ही.ए.गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बी.आर. तनपुरे यांनी केले. त्यांनी याप्रसंगी अभ्यास मंडळाच्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट केली. संजय गोटे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासू वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. डॉ. व्ही.ए. गायकवाड यांनी सध्याच्या नव्या श्रेयांकावर आधारीत पद्धतीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना या नव्या पद्धतीत या प्रकारच्या उपक्रमांना विषेश महत्व असल्याचे सांगीतले. याप्रसंगी विविध अभ्यासमंडळाची स्थापना करण्यात आली यामध्ये डॉ.जी.एस.कुबडे यांच्या मार्गदर्शनात अर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष म्हणून स्वाती ढोले यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून रोहन मोरे, सचिव म्हणून दुर्गा पट्टेबहादूर , कोषांध्यक्ष म्हणून निकिता पट्टेबहादूर, प्रसिद्धी प्रमुख म्हणून सोनाली कांबळे यांची निवड करण्यात आली, डॉ.बी.आर.तनपुरे यांच्या मार्गदर्शनात इतिहास अभ्यासमंडळाचे अध्यक्ष म्हणून अमर खाडे यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून विजया खंडारे, सचिव गजानन पडघान, प्रसिद्धी प्रमुख म्हणून आदित्य गायकवाड यांची निवड करण्यात आली . डॉ. डी.एन.लांजेवार यांच्या मार्गदर्शनात भुगोल अभ्यासमंडळाचे अध्यक्ष म्हणून मयुरी पट्टेबहादूर यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून कु.पंचशिला भिसे,कु.मुस्कान भवानीवाले कोशाध्यक्ष, सचिव म्हणून कु. सानिया महेमूदशहा, प्रसिद्धी प्रमुख म्हणून प्रियंशू दिलीप लांडे यांची निवड करण्यात आली. डॉ. मयुरी वानखेडे यांच्या नेतृत्वात मानसशास्त्र अभ्यासमंडळाची निवड करण्यात आली. ज्यामध्ये ज्यामध्ये ज्ञानेश्वर जाधव, मंगेश गायकवाड व अविनाश खडसे यांची विद्यार्थ्यांची मानसशास्त्र अभ्यासमंडळावर निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.एन.लांजेवार यांनी केले.या कार्यक्रमाला डॉ.व्ही.एन.लांडे , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


# मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

## भुगोल विभाग अभ्यास मंडळ 2022-23

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पदनाम |
| --- | --- | --- |
| ०१. | कु. मयुरी पट्टेबहादूर | अध्यक्ष |
| ०२. | कु. पंचशिला काशीराम भिसे | उपाध्यक्ष |
| ०३. | कु.मुस्कान सुभान भवानीवाले | कोषाध्यक्ष |
| ०४. | कु.सानिया परवीन महेबूबशाह | सचिव |
| ०५. | प्रियंशू दिलीप लांडे | प्रसिद्धी प्रमुख |
| ०६. | कु.सलोनी सुनिल अवचार | सदस्य |
| ०७. | कु. अंजू रामराव पवार | सदस्य |

विषय : शिक्षक/मार्गदर्शकाची स्वाक्षरी

# भूगोल अभ्यास मंडळ स्थापना कार्यक्रम




भूगोल अभ्यास मंडळ स्थापना कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी






मार्गदर्शन करताना डॉ. बी. आर. तनपुरे



# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

दि. 16/01/2023

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील भूगोल विभागाद्वारे भूगोल दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. व्ही.ए.गायकवाड लोकप्रशासन विभाग प्रमुख हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. अभिजीत दौंड (श्रीराम महिला कला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे) हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये श्री संजू भाऊ गोटे सर हे सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वीगोलाच्या प्रतिमापूजनाने झाली कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप लांजेवार यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकेत भूगोल दिनाच्या कार्यक्रम आयोजना मागील हेतू स्पष्ट केला तसेच पाहुण्यांचा परिचय त्यांनी आपल्या प्रस्ताविकेतून करून दिला कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.ए.पी.दौंड यांनी आपल्या मार्गदर्शनात १४ जानेवारी हा दिवस सी.डी. देशपांडे यांच्या जयंती दिनानिमित्त संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. तसेच १४ जानेवारी या दिवशी सूर्य दक्षिण गोलार्धातील मकरवृत्त ओलांडून त्याचे उत्तरायण सुरू होते आणि या दिवसापासून दिवसाचा कालावधी वाढत जातो. तसेच इतरही ज्या काही भौगोलिक घटना पृथ्वी पृष्ठावर घडत असतात त्यासाठी पृथ्वीचे परिवलन परिभ्रमण कशा प्रकारे कारणीभूत आहे ही त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले त्याचबरोबर भूगोल विषय हा स्पर्धा परीक्षेसाठी कशा प्रकारे महत्त्वाचा आहे. भूगोल विषयात विषयात विविध प्रकारचे कोर्सेस उपलब्ध असून त्यातून रोजगाराच्या संधी कशाप्रकारे उपलब्ध करून घेता घेऊ शकतात याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. व्ही.ए. गायकवाड यांनी भूगोल हा विषय स्पर्धा परीक्षेमध्ये किती महत्त्वपूर्ण आहे याविषयी भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. किरण मापारी हिने तर आभार मयुरी पडेबहादूर हिने व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप लांजेवार




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. अभिजीत दौंड




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. व्ही.ए.गायकवाड


# भूगोल विभागाद्वारा अतिथी व्याख्यानाचे आयोजन


दि.१९.०१.२०२३

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालयाच्या भूगोल विभागाद्वारे भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरण संवर्धन' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संजू भाऊ गोटे तर प्रमुख पाहुणे म्हणून तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.व्ही. ई.डोणगावकर हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महात्मा फुले महाविद्यालय अमरावती येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा. दीपक अंभोरे हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भाने पर्यावरण जागृती व आपल्या सभोवती असणाऱ्या पर्यावरणाचा कशा पद्धतीने ऱ्हास होत आहे व त्यासाठी आपण कशाप्रकारे उपाययोजना करू शकतो याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. व्ही. डोणगावकर यांनी पर्यावरण संवर्धना संदर्भाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संजय गोटे यांनी आपण आपला परिसर व समाज यासाठी पर्यावरण संवर्धन करून चांगले कार्य करून एक आदर्श ठेवू शकतो याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी. एन. लांजेवार यांनी केले तर आभार कु. मुस्कान औरंगाबाद हिने व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. दीपक अंभोरे






तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.व्ही. ई.डोणगावकर यांचे स्वागत करताना विद्यार्थी




# चर्चासत्र संपन्न

## विषय:- भूगोलाचा मानवी जीवनाशी संबंध

दि.२८.११.२०२२

मातोश्री शांताबाई गोटे कलाए वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने दिनांक:- रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमाला अनुसरून बी.ए. भाग १ सेम. १ बी.ए. भाग २ सेम ३ व बी.ए. भाग ३ सेम ५ च्या विद्यार्थ्यांचे विभागाद्वारा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. बी.ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी "प्राकृतिक भूगोलाचा मानवी जीवनाशी संबंध" बी.ए. भाग २ सेम ३ च्या विद्यार्थ्यांनी "पर्यावरण प्रदूषण व मानवी आरोग्य" तर बी.ए. भाग ३ सेम.५ च्या विद्यार्थ्यांनी "भारतातील नदी प्रणाली व जलसिंचनाच्या सोयी" या विषयावर विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाला अनुसरून आपले मुद्दे मांडलेत सदर चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी भूगोल विभाग प्रमुख डॉ. दिलीप लांजेवार हे होते या चर्चासत्रामध्ये तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. किरण मामारी आणि कु. मयुरी पट्टेबहादूर तसेच बी.ए. भाग १ सेम. १ ची विद्यार्थिनी कु. मुस्कान बेनिवाले आणि कु. पंचशीला भिसे तसेच बी.ए. भाग २ सेम. ३ च्या कु. स्वाती इंगोले व मंगेश भगत या विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयाला अनुसरून आपले मत मांडले प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी मानवी जीवनाशी भूगोलाचा असणारा संबंध त्याचबरोबर भारतातील नदी प्रणाली व या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या जलसिंचनाच्या सोयी याविषयी आपले मत मांडले शेवटी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. दिलीप लांजेवार यांनी प्राकृतिक भूगोल व मानवी जीवनाशी असणारा संबंध पर्यावरणीय प्रदूषण व मानवी आरोग्य आणि भारतातील नदी प्रणाली आणि जलसिंचनाच्या सोयी या सर्व विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




सेमिनार देताना विद्यार्थिनी




सेमिनार देताना विद्यार्थी



चर्चासत्राला ला उपस्थित विद्यार्थी